<u>स्पे.मु.क्र.४०७/२०१५</u>

श्री. वेणू गोपाळ नायर ...वादी

वि.

निलीमा दिलीप मनवे व इतर ...प्रतिवादी

## :: आदेश निशाणी ५१ वर ::

१. प्रस्तुत अर्जाद्वारे प्रतिवादी यांनी तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जावर युक्तीवाद करण्याकरीता वेळ मिळण्याची विनंती केलेली आहे.

२. अर्जात असे नमुद करण्यात आले आहे की, प्रतिवादी यांचे वकील श्री.गणेश कोळी यांचे सासरे दि.२०/०४/२०१६ रोजी मयत झाले. त्यामुळे ते आजरोजी न्यायालयात हजर राहू शकले नाही. म्हणून निशाणी ५ वर असलेल्या तुर्तातूर्त मनाई हुकूमाच्या अर्जावर युक्तीवाद करण्याकरीता पुढील तारखेपर्यंत त्यांना वेळ मिळण्याची विनंती केलेली आहे.

३. अर्जाच्या पाठीमागे वादी यांनी लेखी म्हणणे दाखल केले व सदर अर्जास हरकत घेतली. त्यात त्यांनी असे नमुद केले की, सदर प्रतिवादी यांनी श्री.कोळी यांचेबरोबरच श्री.ओसवाल यांनासुध्दा त्यांचे वकील म्हणून प्रस्तुत प्रकरणात नियुक्त केले आहे. त्यामुळे श्री.ओसवाल आजरोजी युक्तीवाद करु शकतात. म्हणून त्यांनी अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली.

४. अर्जातील तथ्य कथन व प्रतिकथनाचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणातील अभिलेखाचे अवलोकन केले असता सदर प्रतिवादी यांच्या बाजूने श्री.गणेश कोळी व श्री.सी.बी.ओसवाल हे दोघेही विधिज्ञ म्हणून हजर झाले आहेत. आजरोजी श्री.गणेश कोळी यांचे सासरे मयत झाले असल्यामुळे श्री. गणेश कोळी न्यायालयात हजर राहू शकले नाही. सदर तथ्य कथन विचारात

घेता प्रस्तुत प्रकरणात निशाणी ५ वर असलेल्या तुर्तातुर्त मनाई हुकूमाच्या अर्जावर पुढील तारखेपर्यंत वेळ प्रतिवादी यांना देण्यास काहीही हरकत नाही. म्हणून, प्रस्तुत अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**:: आदेश ::**

१. प्रस्तुत अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. प्रस्तुत प्रकरण पुढील तारखेपर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

पनवेल. (राजेश क. खोमणे)
दिनांक २१/०४/२०१६. २रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, पनवेल.